# समानुभूति

## २४ जून, २०२२

### अमी बन्सल आणि गरिमा बोरवणकर यांच्याद्वारे लिखित भाष्य

### भाग ३

गुरुमाई चिद्विलासानंद यांनी २४ जून, २०२२ला प्रदान केलेला सद्‌गुण, 'समानुभूति'वर भाष्य लिहिण्याचे हे अद्‌भुत कार्य करताना आमच्या हे लक्षात येऊ लागले आहे की, आपण जर या सद्‌गुणाचे अन्वेषण करणे सुरू ठेवले, तर ज्याप्रमाणे 'समानुभूति'चे सकारात्मक प्रभाव अक्षय आहेत, त्याचप्रमाणे या सद्‌गुणाच्या बोधाची गहनतादेखील अनंत आहे. जसजसे आम्ही याचा अधिकाधिक शोध घेत आहोत आणि याविषयी अधिकाधिक शिकत आहोत, तसतसे आम्हाला असे दिसून येते आहे की, या सद्‌गुणाच्या अन्वेषणाच्या फलस्वरूप जी समज आम्हाला प्राप्त होते आहे, ती आचरणात आणण्यासाठी आमच्याकडे भरपूर संधीदेखील उपलब्ध आहेत.

या भाष्याच्या भाग १ व २मध्ये, आपण हे शिकलो की, 'समानुभूति'चा आधार हे ज्ञान आहे की, एकच आत्मा या ब्रह्मांडातील समस्त जड व चेतन यांमध्ये वास करतो. आपण इतर लोकांशी, प्राण्यांशी आणि आपल्या सभोवतालच्या वस्तूंशी असलेले आपले ऐक्य जितके अधिक पाहू शकतो, तितकेच अधिक आपण या गोष्टीचा अर्थ समजू शकतो की, या जगतातील सर्व गोष्टी परस्परांशी संबंधित आहेत. आपण यावरही चिंतनमनन केले की, 'समानुभूति' अंतरातून उदित होण्यासाठी मनाचे संतुलन विकसित करणे आणि समस्थिती निर्माण करणे अनिवार्य आहे.

समानुभूति काय आहे, या विषयावर आपण आपले अध्ययन जसजसे पुढे नेत आहोत, तसतसे आपण हे पाहू शकतो की, कशा प्रकारे या सद्‌गुणाचा प्रत्येक पैलू एकमेकावर आधारित आहे आणि कशा प्रकारे हे सर्व पैलू एकत्रितपणे आपल्याला मदत करतात जेणेकरून आपण या सद्‌गुणाविषयी अधिक विस्तृत समज प्राप्त करीत याला आणखी पूर्णपणे समजण्याच्या अधिक निकट येऊ शकू. निरंतर सुरू राहणाऱ्या शोधाच्या या प्रक्रियेतून, आम्हा दोघींच्या म्हणजे अमी आणि गरिमा यांच्या मनात हा विचार आला की, हे तर भारताच्या एखाद्या मंदिरात जाण्यासारखे आहे. आपण भगवंताच्या दर्शनासाठी मंदिरात जेव्हा सर्वप्रथम प्रवेश करतो, तेव्हा आपल्याला त्याच्या स्वरूपाच्या एखाद्याच भागाचे दर्शन होते—त्याचा एक

हात किंवा त्याचे चरण किंवा कदाचित त्याच्या मुखमंडलाची एक झलक. केवळ इतकेच दर्शन पुरेसे असते, आपले हृदय भक्तिभावाने आणि भगवंताच्या संपूर्ण स्वरूपाचे दर्शन घेण्याच्या तीव्र उत्कंठेने भरून टाकण्यासाठी. जसजसे तुम्ही गर्भगृहाच्या आणखी निकट पोहोचता, तसतशी तुमची उत्कंठा वाढत जाते, आणि शेवटी, तो क्षण येतो जेव्हा तुम्ही भगवंताच्या पूर्ण व प्रत्यक्ष स्वरूपाच्या समक्ष उपस्थित असता. काय घडते त्या क्षणी? दर्शन—अंतरी दिव्यतेचा बोध. भगवंताच्या प्रकाशात पूर्णपणे तन्मय होऊन जाणे, तुम्हाला चुंबकाप्रमाणे तुमच्या अंतरस्थ मौनाकडे खेचून घेते; हे मौन जे इतके गोड असते, इतके उत्कृष्ट असते की, तुम्हाला बस त्याच्यासमवेतच राहावेसे वाटते.

त्याच प्रकारे, जसजसे आपण 'समानुभूति'चा प्रत्येक पैलू अनावृत करत जातो आणि त्याच्याविषयी शिकत जातो, जसजसे आपण या सद्गुणाच्या सर्व सूक्ष्म अर्थांचे अध्ययन करण्याचा आणि त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करत जातो, तसतसे आपण या सद्गुणाचे संपूर्ण वैभव अनुभवण्याच्या अधिकाधिक निकट येत जातो.

***

आता आपण 'समानुभूति'चा चौथा पैलू पाहू या ज्याचा उल्लेख भाग १मध्ये केला गेला होता.

**'समानुभूति' समतेचा किंवा साम्य असण्याचा बोध आहे, जो सखोल समवेदना, करुणा व समजूतदारपणाचा भाव जागृत करतो.**

भाग १मध्ये तुम्ही हे जाणले की, इंग्रजी भाषेमध्ये 'समानुभूति'च्या अर्थाशी मिळताजुळता शब्द आहे *empathy* [एम्पथी] म्हणजेच 'सखोल समवेदना' किंवा 'सहानुभूती.' भाष्याच्या या भागामध्ये, आपण आणखी गहनतेने अन्वेषण करणार आहोत की, 'सखोल समवेदना' किंवा 'सहानुभूती' ही नेमकी काय आहे, तिचा उदय कुठून होतो आणि ती आचरणात आणल्यावर तिचे स्वरूप कसे असते. [हे समजण्यासाठी आपण या वाक्याच्या पहिल्या भागाविषयी म्हणजेच 'समानुभूति'चा सखोल समवेदनेशी किंवा सहानुभूतीशी काय संबंध आहे,' याविषयी आपली समज अधिक परिष्कृत करू; भाष्याच्या भाग ४मध्ये आपण करुणा आणि समजूतदारपणा यांविषयी सखोलतेने जाणून घेऊ.]

आम्ही दोघी, या भाष्याच्या लेखिका, जेव्हा अशा 'गहन समवेदने'विषयी विचार करतो जी 'समानुभूति'शी निगडित आहे, तेव्हा आम्हाला एक प्रसंग आठवतो जो आम्हाला एकदा एका वयोवृद्ध सिद्धयोगीने सांगितला होता. अनेक वर्षांपूर्वी, १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला, एके दिवशी त्या

गुरुदेव सिद्धपीठाच्या गुरुचौकात बसल्या होत्या, जेव्हा बाबा मुक्तानंद दर्शन देत होते. दर्शनाच्या रांगेत एक महिला उभी होती, जी नजीकच्याच गावात राहत होती. बाबांच्या समक्ष पोहोचताच ती महिला दबलेल्या आवाजात रडू लागली. बाबांनी हळुवारपणे तिला विचारले की, काय झाले आहे. तिने सांगितले की, अलीकडेच तिच्या एकुलत्या एक मुलाचा मृत्यू झाला आहे. जेव्हा ती महिला सांगत होती तेव्हा तिचे अश्रू थांबतच नव्हते; तिचे दुःख शब्दांच्या पलीकडचे होते, तरीही ते तिच्या चेहऱ्यावरील भावांमध्ये, तिच्या संपूर्ण अस्तित्वात अतिशय स्पष्टपणे दिसत होते.

बाबा त्या महिलेचा हात आपल्या हातात घेऊन, तिची व्यथा कान देऊन ऐकत होते. ती जेव्हा सांगत होती, तेव्हा बाबांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. बाबा तिथे होते, पूर्णपणे त्या मातेच्या *समवेत,* तिच्या वेदनेसमवेत. त्यांची उपस्थिती, त्यांचे प्रेम त्या शोकाकुल आईला धीर देत होते, तिची सांत्वना करत होते, तिच्या घावांवर मलम लावत होते. जे लोक त्या दर्शनाच्या वेळी तिथे उपस्थित होते, ते सर्वजण हे दृश्य पाहून हेलावून गेले.

***

इतर अनेक सद्‌गुणांप्रमाणेच, समवेदना किंवा सहानुभूती बाहेरून मिळवता येत नाही. ती आपला अंगभूत स्वभाव आहे. तरीदेखील हा सद्‌गुण आपल्या अंतरी शोधून त्याला व्यक्त करण्याचा प्रयत्न कधीकधी अतिशय कठीण व चिंताजनक वाटू शकतो.

आपण आपल्या श्रीगुरूंकडून हे शिकलो आहोत की, जसजसे आपण आपल्या साधनेत प्रगती करत जातो आणि आपण कोण व काय आहोत याविषयी जागरूक होत जातो, तसतसे आपल्यासमोर सद्‌गुणांचा कोष आणि अवगुणांचा कोष, दोन्ही येतात. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत, आपण यांपैकी कोणत्या ना कोणत्या कोषाकडे आकर्षित होऊ शकतो आणि आपण जर सावधगिरी बाळगली नाही, तर आपली मनःस्थिती, आपला दृष्टिकोन हे परिस्थितीनुसार बदलत राहतील. *आज माझ्यासमोर कोणता कोष येईल?* साधनेत हा प्रश्न पुन्हापुन्हा उद्‌भवत राहतो आणि म्हणूनच हे आवश्यक आहे की, आपण सातत्याने सामंजस्य स्थापित करावे आणि पुन्हापुन्हा सामंजस्य स्थापित करत राहावे, आपण स्थितीचे निरीक्षण करून ती सुव्यवस्थित करावी आणि पुन्हापुन्हा सुव्यवस्थित करत राहावी जेणेकरून आपण हे सुनिश्चित करू शकू की, कोणताही कोष आपल्यासमोर आला, तरीही आपण आपल्या अंतरी एक सूक्ष्म संतुलन कायम ठेवू.

महत्त्वाची गोष्ट ही आहे की आपण हे लक्षात ठेवावे की, निवड करण्याची संधी आपल्याकडे नेहमीच असते. जेव्हा अवगुणांचा कोष आपल्यासमोर येतो, तेव्हा आपण याची निवड करू शकतो की, आपण तो कोष उघडावा की नाही. आपण याची निवड करू शकतो की, आपण आपल्या अवगुणांमध्ये लिप्त व्हावे किंवा नाही, त्यांना आपल्यावर मात करू द्यावी किंवा नाही, कोणत्याही परिस्थितीला आपण क्रोध वा भय वा गर्व यांच्या प्रभावाखाली येऊन प्रतिसाद द्यावा किंवा नाही.

आपण अवगुणांच्या जाळ्यात न अडकण्याच्या आणि आपली दिशा बदलून त्यांच्यापासून दूर जाण्याच्या क्षमतेचा व विचारशीलतेचा विकास करू शकतो. अशा प्रकारे आपण जेव्हा आपली दिशा बदलतो व त्यांच्यापासून दूर जातो, तेव्हा एका प्रकारे आपण 'लेझी सुझन'वरून खाली उतरतो. ['लेझी सुझन' जेवणाच्या टेबलवर लावलेली एक तबकडी असते, जी गोल फिरवता येते, जेणेकरून टेबलाच्या सभोवती बसलेल्या लोकांपर्यंत जेवण पोहोचू शकेल.] दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, आपण तबकडीवरून खाली उतरतो जी आपल्या अंतरी सतत फिरत असते आणि आपल्याला पुन्हापुन्हा आपल्या अवगुणांच्या कोषाच्या समक्ष घेऊन येत असते.

आपण असादेखील निर्णय घेऊ शकतो की, आपण स्वतःला या अवगुणांच्या रूपात इतके जास्त ओळखणार नाही—आपण उद्धटपणे, हताश होऊन आणि विरोध दर्शवणाऱ्या भावनांसह असा विचार करणार नाही की, *हो मग, मी हा असाच आहे. असाच आहे मी. मी तर रागीटच आहे.* अशा क्षणांमध्ये आपली निवड थेट या गोष्टीशी संबंधित असते की, आपण आपल्या साधनेद्वारे, आपल्या मनाला आणि आपल्या हृदयाला अनुशासित करण्यासाठी कशा प्रकारे स्वप्रयत्न केला आहे.

सद्‌गुणांच्या कोषाबाबतीतही असेच असते. आता, कदाचित तुम्ही असा विचार करत असाल : *सद्‌गुणांचा कोष उघडणे लाभदायक नाही का? मी सद्‌गुणांचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करायला नको का?* निश्चितच, आपण आपल्या श्रीगुरूंकडून आपल्या अंतरी निहित असलेल्या सद्‌गुणांचे पोषण करण्यास शिकतो, कारण ते आपल्या साधनेला उन्नत करतात व आपल्याला साधनेमध्ये अग्रेसर करतात, तसेच ते आपल्याला एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी मदत करतात. तथापि, ज्याबाबतीत आपल्याला सतर्क राहण्याची गरज आहे, ती म्हणजे, या सद्‌गुणांमध्ये आसक्त होणे. ज्या प्रकारे आपण अवगुणांनी आपली ओळख करू शकतो, अगदी तसेच आपण सद्‌गुणांनीदेखील आपली ओळख करू शकतो. कदाचित आपण असा विचार करू शकतो, *मी किती दयाळू आहे. मी किती कनवाळू आहे. मी एक करुणाशील मनुष्य आहे.* आपण जेव्हा अशा प्रकारे सद्‌गुणांच्या आधारे स्वतःला ओळखू लागतो, तेव्हा आपण स्वतःला सीमित अहंमध्ये खेचून घेतो. अशा प्रकारे आपण सद्‌गुणांचा उपयोग आपल्या

अहंकाराची चाकरी करण्यासाठी करत असतो, आपला गर्व वाढवण्यासाठी असलेले एक साधन म्हणून आपण सद्‌गुणांचा वापर करत असतो. वास्तवात, सद्‌गुण म्हणजे कोणतेही लेबल नव्हे जे आपल्याला स्वतःवर चिकटवायचे आहे किंवा ते कोणतीही ओळख नव्हेत जिच्या आधारे आपण स्वतःची ओळख कायम करायची असते; सद्‌गुण हे आचरणात आणण्यासाठी असतात, ते आपल्याला सांगतात की, आपण कशी व्यक्ती बनले पाहिजे. जी व्यक्ती संवेदनशील असते, ती संवेदनशील *असते;* संवेदनशीलता तिच्या आचरणात व्यक्त होते. ती व्यक्ती इकडेतिकडे बसून हे सांगत फिरत नाही की, ती किती संवेदनशील आहे.

तेव्हा, होय, सद्‌गुणांचा कोष उघडणे हितकर असते. पण एकदा का आपण असे केले, की आपण सतर्क राहायला हवे, आपण या गोष्टीविषयी सजग राहिले पाहिजे की, आपण त्या सद्‌गुणांचा सन्मान कशा प्रकारे करतो, त्यांच्याशी असलेल्या आपल्या संबंधाचे स्वरूप काय आहे, आणि आपण त्यांचा उपयोग कशा प्रकारे करतो. म्हणूनच *संतुलन* आवश्यक असते, म्हणूनच आपल्या आत्म्यात केंद्रित राहणे अनिवार्य असते, म्हणूनच हे सुनिश्चित करणे आवश्यक असते की, ज्या कोणत्या गोष्टीला आपण *वाईट* किंवा *चांगले* मानतो तिने आपल्याला खेचून मार्गावरून दूर घेऊन जाता कामा नये. त्याऐवजी, जेव्हाजेव्हा सद्‌गुणांचा वा अवगुणांचा कोष आपल्यासमोर येईल, तेव्हा आपण आपले ज्ञान आणि विवेकबुद्धी यांचा उपयोग करू शकतो. जसजसे आपल्याला हे उमजत जाते की, अवगुणांचा उपयोग इतरांविरुद्ध करू नये, तसतसे हळूहळू आपण त्यांचा समूळ नाश करू शकतो. आणि सद्‌गुणांचा विकास आपण विशेषतः यासाठी करतो की, जेणेकरून दुसऱ्यांची मदत करण्यासाठी आपल्याला त्यांचा उपयोग करता यावा.

***

सिद्धयोग मार्गावर आपले अध्ययन आणि अभ्यास यांद्वारे आपल्याला बौद्धिक आणि आंतरिक, अशा दोन्ही स्तरांवर ही समज प्राप्त होते की, कशा प्रकारे सहानुभूती किंवा सखोल समवेदना आपल्यात अंगभूत आहे. हे पाहणे उपयुक्त आणि रोचक असू शकते की, कशा प्रकारे संपूर्ण जगानेदेखील या ज्ञानाला पुष्टी दिली आहे. उदाहरणार्थ, आपण विज्ञानाकडे आणि इतिहासाकडे पाहू शकतो.

वैज्ञानिकांना असे आढळून आले आहे की, एकमेकांच्या भावना अनुभवण्याच्या आपल्या क्षमतेचा संबंध मेंदूतील मज्जातंतूच्या [मज्जासंस्थेसंबंधी म्हणजेच न्यूरल] प्रतिक्रियांशी आहे. हे दर्शवणारे अनेकानेक पुरावे उपलब्ध होत आहेत की, हा संबंध मानवरूपात होणाऱ्या आपल्या उत्क्रांतीच्या इतिहासाचा भाग आहे, आणि हा संबंध कुठल्या ना कुठल्या स्वरूपात इतर अनेक पशूंमध्येदेखील अस्तित्वात आहे.

संवेदनशीलतेचा विकास हा अनेक प्रजातींचे अस्तित्व टिकून राहण्याशी संबंधित आहे, कारण यामुळे मातापित्यांना त्यांच्या अपत्यांच्या गरजांप्रति जागरूक राहण्यास व त्या पूर्ण करण्यास प्रेरणा मिळते.

सामूहिक स्तरावर संवेदनशीलता अभिव्यक्त केल्याने संपूर्ण मानवजात स्पष्टपणे लाभान्वित होते. प्रागैतिहासिक काळापासूनच [इतिहासपूर्व काळ] मानवांनी ही गोष्ट जाणली आहे की, एकत्र राहिल्याने, एकमेकांची काळजी घेतल्याने आणि एकमेकांना मदत केल्याने सर्वजण सुरक्षित आणि भयमुक्त राहतात. निश्चितच, याच जाणीवेमुळे सुरुवातीला असे जनसमुदाय बनले, जे सामूहिकरीत्या शिकार करत, एकत्र मिळून अन्नधान्य पिकवत आणि एकमेकांच्या मदतीने निवाऱ्याची रचना करत. आपला वर्तमान समाज जरी खूप विकसित झाला असला आणि बदललादेखील असला, तरी तो याच आदर्शातून उदयास आला आहे की, जिवंत राहणे आणि सरतेशेवटी उत्कर्ष पावणे यासाठी एकमेकांना साहाय्य करणे आवश्यक आहे. आपण जेव्हा एकमेकांप्रति सहानुभूती म्हणजे संवेदनशीलता व्यक्त करतो, तेव्हा याने आपल्याला मदद होते जेणेकरून आपण आपल्या विभिन्न समूहांमध्ये आणि समुदायांमध्ये, आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि मित्रमंडळींमध्ये आणि आपल्या आणखी मोठ्या समाजात एकमेकांना मदत करू शकतो आणि परस्परांत सामंजस्य पोषित करू शकतो.

याखेरीज, यांपैकी अनेक समूहांची संरचना ज्या प्रकारे केलेली असते ती, सामूहिक स्तरावर 'समानुभूति' बहरत राहावी आणि एकमेकांप्रति ती व्यक्त होत राहावी याकरिता सैद्धान्तिक रूपाने उपयुक्त असते, मग आपण त्या समूहांना एखाद्या एकट्या कुटुंबाच्या रूपात पाहत असू किंवा एका संपूर्ण समाजाच्या रूपात पाहत असू. विशेषतः, या समूहांमध्ये एक प्रकारचा क्रम असतो, एक प्रकारची व्यवस्था असते, यांमध्ये श्रेणी असतात किंवा एक हुद्दा असतो जो हे दर्शवतो की, या समूहांमध्ये लोकांचे काय स्थान किंवा पद आहे. भिन्नभिन्न स्तरांवर कुटुंबप्रमुख माता, कुटुंबप्रमुख पिता आणि नेतृत्व करणारे प्रतिनिधी असतात. अशा प्रकारच्या संरचनेचा जेव्हा स्वीकार केला जातो आणि तिचा सन्मान केला जातो, तसेच त्या संरचनेतील ज्या लोकांना अधिकारी भूमिका दिल्या गेल्या असतात ते जेव्हा त्या संरचनेचा दुरुपयोग करीत नाहीत, तेव्हा तो समूह अधिक सहजपणे आणि प्रभावीपणे कार्य करू शकतो.

म्हणून सन्मान हा बहुधा या सामूहिक संरचनांचा मूलभूत भाग आहे, कारण त्या यशस्वी होण्यासाठी सन्मान अत्यावश्यक असतो. लोक एकमेकांसाठी ज्या भाषेचा वापर करतात आणि ज्या पद्धतीने ते इतर लोकांशी आचरण करतात, त्यामध्ये आपल्याला या सन्मानाचा पुरावा मिळतो. उदाहरणार्थ, अनेक संस्कृतींमध्ये वडीलधाऱ्यांना [किंवा अशी एखादी व्यक्ती जी वयाने आपल्यापेक्षा मोठी असेल, तिला]

विशिष्ट उपाधींद्वारे किंवा नामांद्वारे संबोधित करण्याची प्रथा आहे. दक्षिण भारतात बोलल्या जाणाऱ्या कन्नड भाषेमध्ये मोठ्या बहिणीला किंवा आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या कोणत्याही महिलेला 'अक्क' असे म्हटले जाते. हिंदी भाषेत आपल्यापेक्षा मोठ्या लोकांना संबोधित करणे आणि औपचारिक संबोधन, या दोहोंसाठी आदरसूचक संबोधन 'जी'चा प्रयोग केला जातो, हे जपानी भाषेतील 'सान' *(san)* या शब्दासमान आहे. फ्रेंच आणि स्पॅनिश भाषांमध्ये औपचारिक सर्वनामे [फ्रेंचमध्ये 'वू' *(vous)* आणि स्पॅनिशमध्ये 'उस्टेड' *(usted)*] तेव्हा वापरले जातात, जेव्हा अशा व्यक्तीला संबोधित केले जात असते, की जी विशिष्ट रूपात सन्माननीय असते, या कारणाने की एकतर ती व्यक्ती सामाजिक किंवा व्यावसायिक रूपात एखाद्या विशेष पदावर असते किंवा केवळ यामुळे की कदाचित त्या व्यक्तीशी बोलणाऱ्याचा परिचय अधिक नसेल.

दुसरे उदाहरण आहे, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंधाचे स्वरूप. इथेदेखील सन्मान अपेक्षित असतो, किंबहुना, शिकण्याची प्रक्रिया व्हावी यासाठी तो अनिवार्य असतो. विद्यार्थ्याने शिक्षकाच्या ज्ञानाचा आणि अधिकाराचा सन्मान केलाच पाहिजे. आणि शिक्षकानेही विद्यार्थ्याचा सन्मान केला पाहिजे—त्याच्या अद्वितीय योग्यतांचा, त्याच्या पार्श्वभूमीचा जिच्या आधारे तो ज्ञानार्जन करतो आहे, त्याच्या ग्रहणशीलतेचा आणि त्याच्या विकासशील बोधाचा. मार्शल आर्टस्‌मध्ये विशेषतः, सेन्सेई, म्हणजे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना स्पष्टपणे हे शिकवतो की, त्यांनी त्यांच्या शिक्षकाचा तसेच परस्परांचा आदर कसा करावा, तो कशा प्रकारे प्रदर्शित करावा. आणि जगभरातील उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थामध्ये जेव्हा नवीन विद्यार्थी प्रवेश घेतात, तेव्हा त्यांना बहुधा एका आदर्शाच्या रूपात, जीवनातील नैतिक मूल्याच्या रूपात सन्मान करणे शिकवले जाते. यांमधील काही विद्यापीठांच्या घोषवाक्यांमध्ये आणि बोधवाक्यांमध्येदेखील सन्मानाच्या संकल्पनेने आपले स्थान प्राप्त केले आहे. उदाहरणार्थ, राजधानीचे शहर, होनोलूलूच्या शेजारी स्थित असलेले मानोआ येथील हवाई विद्यापीठ, आपल्या विद्यार्थ्यांचे स्वागत 'वेलिना मानोआ' [*Welina Mānoa*] अशा अभिवादनासह करते, ज्याचा शाब्दिक अर्थ आहे, 'मानोआमध्ये आपले स्वागत आहे.' तथापि, हे विद्यालय या अभिवादनाचा सविस्तर अर्थ सांगते, जो असा आहे : 'मानोआ त्याच प्रकारे आपले अभिवादन करते, ज्या प्रकारे आपण मानोआचे अभिवादन करतो.' विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना असा आग्रह करते की, त्यांनी निसर्गाशी, विशेषतः त्या भूमीशी एकोप्याने राहावे, आणि त्यांनी परस्पर सन्मानाच्या या दृष्टिकोनाचा अंगीकार करावा.

जे विद्यार्थी सन्मान करण्याचे महत्त्व शिकतात, त्यांना जणूकाही एक तावीज, एक लंगररूपी दृढ आश्रय, एक भक्कम आधार मिळतो, ज्यामुळे ते आपले शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर बऱ्याच काळानंतरदेखील

त्यापासून मदत घेऊ शकतात. विद्यार्थी त्यांना शिकवलेल्या त्या घोषवाक्यांचे आणि बोधवाक्यांचे स्मरण ठेवतात आणि जेव्हा ते एखाद्या अशा परिस्थितीत असतात जेव्हा अगदी थोड्याशा अधिक सन्मानाने आचरण केल्यास त्या परिस्थितीत सुधारणा होऊ शकते, तेव्हा त्या घोषवाक्यांतील शब्दांची त्यांना प्रचिती येऊ शकते. या लोकांसाठी सन्मान हा एक मार्गदर्शक सिद्धान्त बनतो, एक असा सिद्धान्त की, ज्याच्यावर ते विश्वास ठेवू शकतील; जे लोक स्वतःला 'आस्तिक' किंवा 'आस्थेवाईक' मानत नाहीत, अगदी ते लोकसुद्धा या सिद्धान्ताचा आश्रय घेऊ शकतात आणि त्याला पाठिंबा देण्यास उभे राहू शकतात.

ही दुर्भाग्याची बाब आहे की, या जगात बऱ्याचदा, पुन्हापुन्हा असे घडते की, ज्या संरचना विविध प्रकारच्या समूहांना परिभाषित आणि संचालित करतात, त्यांचा दुरुपयोग केला जातो, त्यांच्यात फेरफार केला जातो आणि सत्ताधारी लोकांच्या मर्जीनुसार, त्यांच्या लहरीनुसार त्या बदलल्या जातात. मुद्दा असा आहे की, जर त्या संरचनांच्या मूलभूत आणि तथाकथित उद्देशाची पूर्ती केली जात असेल—जो आहे सामाजिक व्यवस्था किंवा क्रम टिकवून ठेवणे—तर त्यामुळे अतिशय स्वाभाविकपणे सन्मानाच्या संस्कृतीला प्रोत्साहन मिळते. परस्परांचा सन्मान करणे याला जेव्हा लोक आपली आधाररेषा बनवतात, जेव्हा त्यांना याची समज असते की, समोरील व्यक्ती कोण आहे आणि तिच्याशी कसे आचरण केले पाहिजे, तेव्हा सामंजस्य स्थापित होऊ शकते. आणि जेव्हा सामंजस्याचे आधिपत्य असते, तेव्हा समानुभूतिचा सद्‌गुण बहरू शकतो.

जेव्हा लोकांना एकमेकांच्या तुलनेत आपल्या स्थितीचे वा पदाचे आकलन करत राहण्याची आणि बचाव करत राहण्याची गरज वाटत नाही, तेव्हा ते पाहू शकतात की इतर लोक कोण आहेत आणि इतर लोक त्यांना खरोखर पाहू शकतात. तेव्हा प्रत्येक व्यक्ती आपल्या विशिष्ट पद्धतीने, समूहात तिच्या विशिष्ट स्थितीनुसार वा पदानुसार, आपल्या जीवनातील विशिष्ट अनुभव आणि सहज कल यांच्यानुसार आपली संवेदनशीलता प्रदर्शित करू शकते. मातापित्यांनी आपल्या बालकासाठी व्यक्त केलेली संवेदनशीलता ही बालकाने मातापित्यासाठी व्यक्त केलेल्या संवेदनशीलतेपेक्षा भिन्न असेल. शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्याप्रति व्यक्त केलेली संवेदनशीलता ही विद्यार्थ्याने त्याच्या सहपाठीसाठी व्यक्त केलेल्या संवेदनशीलतेपेक्षा भिन्न असेल. खरे तर, जेव्हा या विभिन्न स्तरांवर सर्वत्र संवेदनशीलता व्यक्त केली जाते, जेव्हा या जगताच्या भिन्नतांमध्ये आणि विविधतांमध्ये व्याप्त असलेली एकात्मता अनुभवली जाते, तेव्हाच तिचे सामर्थ्य निराळे असते. आम्हाला, म्हणजे अमी आणि गरिमा यांना बाबा मुक्तानंदांच्या त्या प्रसंगाचे स्मरण होते आहे, जेव्हा बाबा त्या महिलेला दर्शन देत होते जिने तिचा मुलगा गमावला होता आणि बाबांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले होते. ते श्रीगुरू होते, सद्‌गुरू,

जगद्‌गुरू होते, जे इतक्या प्रत्यक्षपणे त्या दुःखाने व्याकूळ झालेल्या आईच्या वेदनेत सहभागी होत होते. त्याचबरोबर, आपण हेदेखील जाणतो की, श्रीगुरूंचे अश्रू हे अमर्त्य लोकातून येतात, मनोभावांच्या स्थानातून नव्हे, म्हणून त्या अश्रूंमध्ये जन्मजन्मांतरींची कर्मे धुऊन टाकण्याचे सामर्थ्य असते—आणि या प्रसंगामध्ये आई आणि तिचा मुलगा, दोहोंची कर्मे.

या भाष्याच्या भाग ३चे समापन करताना आम्ही आपल्याला श्रीगुरुमाईंचे शब्द बोधात धारण करण्यास आमंत्रित करू इच्छितो :

*जेव्हा आपण या ब्रह्मांडाशी एकोप्याने राहतो—*
*तेव्हा श्वासोच्छ्‌वास सहज होतो,*
*जीवन लालित्यपूर्ण होते,*
*आणि प्रत्येकाची भरभराट होते.*

***क्रमशः...***

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.